ग्रामपंचायत पोटनिवडणूक
नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागांबाबत

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.२/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २१/०६/२०२२

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून),

विषय :- ग्रामपंचायत पोटनिवडणूक
नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागांबाबत

संदर्भ :-१. आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २२/०४/२०२२ चे मतदार यादी कार्यक्रम आदेश
२. आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २९/०४/२०२२ चे निवडणूक कार्यक्रम आदेश

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण ,संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ii) आयोगाच्या समक्रमांकाच्या संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक २२/०४/२०२२ च्या आदेशान्वये निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूका घेण्यासाठी दिनांक २८/०४/२०२२ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केली असून दिनांक ०५/०५/२०२२ रोजी सुमारे २६०५ ग्रामपंचायतीतील ३९८५ रिक्त पदांच्या पोटनिवडणूकांसाठी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली होती.

iii) आयोगाच्या समक्रमांकाच्या संदर्भाधीन क्र. २ येथील दिनांक २९/०४/२०२२ च्या आदेशान्वये उक्त रिक्त पदांपैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या सुमारे ४९० जागा वगळून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण प्रवर्गाच्या उर्वरित ३४९५ रिक्त जागांसाठी पोटनिवडणूकीचा कार्यक्रम देण्यात आला होता.

iii) मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका ८४१/२०२१ व इतर संलग्न याचिका, रिट याचिका क्रमांक १९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिका व रिट याचिका १४१/२०२२ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक ०४/०५/२०२२ रोजी दिलेला निर्णय विचारात घेता, **नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागा भरण्यापूर्वी त्या अनारक्षित करुन सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन महिलांसाठी ५० टक्के जागा आरक्षित ठेवून सोडत काढणे आवश्यक आहे.**

iv) **मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून,** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ) मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, **उक्त निवडणूक कार्यक्रमातून वगळलेल्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या सुमारे ४९० रिक्त जागा भरण्यापूर्वी त्या अनारक्षित करुन सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन रिक्त पदांचा पोटनिवडणुक कार्यक्रम राबविण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.**

## आदेश

१) **नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखीव असलेल्या रिक्त जागा प्रथमतः सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करण्यात याव्यात.**

२) वर नमूद केल्यानुसार मुलतः नागरिकांच्या मागसवर्ग प्रवर्गाकरीता आरक्षित असलेल्या ज्या जागा सर्वसाधरण प्रवर्गाच्या होतील, त्या जागांपैकी सर्वसाधारण महिलांकरीता आरक्षित ठेवावयाच्या जागा या आरक्षण चक्रानुक्रमे फिरण्याच्या तत्वानुसार कोणत्या प्रभागात देय होतील हे निश्चित करण्यात यावे.

७) आवश्यकतेनुसार सदर जागांचे महिलांकरीता आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत प्रक्रिया राबविण्यात यावी. सोडत प्रक्रियेमध्ये सर्वसाधारण झालेल्या जागांपैकी कोणत्या जागा सर्वसाधारण महिलांकरीता होतील हे निश्चित करण्यात यावे.

८) **परिशिष्ट १ मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार आवश्यक आहे तिथे सोडतीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.**

९) सोडतीनंतर त्यानुसार महिलांकरीता सुधारीत आरक्षण अधिसूचित करण्यात यावे व त्यास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

१०) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागांचा जिल्हानिहाय तपशिल परिशिष्ट २ मध्ये देण्यात आला आहे.

११) सदर कार्यक्रम परिशिष्ट १ मधील कार्यक्रमानुसार पार पाडला जाईल याची संबंधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

१२) राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी क्रमांक ( ग्रा.पं. शाखा) | ०२२-२२८४६७२० |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | ०२२-२२८८६९५० |
| ई-मेल | sec.mh@gov.in |

सदरचा कार्यक्रम आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सोबत - परिशिष्ट - १ व परिशिष्ट - २

( किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग/वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
८. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग
९. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.
१०. निवड नस्ती.

## परिशिष्ट १

(क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.०२/का.०८,दिनांक २१/०६/२०२२ च्या आदेशासोबतचे पत्र)

**ग्रामपंचायत पोटनिवडणूक कार्यक्रम - नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागांबाबत**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | ज्या ठिकाणी सोडत काढणे आवश्यक आहे तिथे सोडतीकरीता विशेष ग्रामसभेची सूचना देण्याचा दिनांक | दिनांक २४/०६/२०२२ (शुक्रवार) |
| २ | विशेष ग्रामसभेमध्ये आवश्यकतेनुसार सर्वसाधारण जागा निश्चित करण्यासाठी सोडतीचा दिनांक | दिनांक २८/०६/२०२२ (मंगळवार) |
| ३ | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची रिक्त जागा सर्वसाधारण जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी पूर्वी सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करुन त्याबाबत योग्य ती सूचना व प्रसिध्दी देण्याचा दिनांक | दिनांक ३०/०६/२०२२ (गुरुवार) |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

( क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.०२/का.०८, दिनांक २१/०६/२०२२ च्या आदेशासोबतचे सहपत्र)

**परिशिष्ट ब**

**रिक्त पदांच्या पोटनिवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार तपशिल**

| अ.क्र. | जिल्हा | ग्रामपंचायतींची संख्या | सर्वसाधारण प्रवर्ग म्हणून अधिसूचित करावयाच्या ना.मा.प्र एकूण रिक्त जागा |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | १ | १ |
| २ | पालघर | ० | ० |
| ३ | रायगड | ५ | ५ |
| ४ | रत्नागिरी | ७ | १० |
| ५ | सिंधुदुर्ग | १ | १ |
| ६ | नाशिक | १३ | १५ |
| ७ | धुळे | ५ | ५ |
| ८ | जळगांव | ११ | ११ |
| ९ | नंदुरबार | २ | २ |
| १० | अहमदनगर | १३ | १३ |
| ११ | पुणे | ५३ | १११ |
| १२ | सोलापूर | १४ | १५ |
| १३ | सातारा | २४ | ४१ |
| १४ | सांगली | ४ | ५ |
| १५ | कोल्हापूर | ५ | ५ |
| १६ | औरंगाबाद | १२ | १६ |
| १७ | बीड | १२ | १५ |
| १८ | नांदेड | २७ | ३५ |
| १९ | उस्मानाबाद | ११ | १८ |
| २० | परभणी | ८ | ९ |
| २१ | जालना | ८ | ८ |
| २२ | लातूर | ६ | ७ |
| २३ | हिंगोली | ११ | १५ |
| २४ | अमरावती | ५ | ८ |
| २५ | अकोला | ३ | ३ |
| २६ | यवतमाळ | १६ | १६ |
| २७ | वाशिम | ९ | २८ |
| २८ | बुलडाणा | ८ | ११ |
| २९ | नागपूर | २० | २३ |
| ३० | वर्धा | ६ | ९ |
| ३१ | चंद्रपूर | ८ | ८ |
| ३२ | भंडारा | ३ | ६ |
| ३३ | गोंदिया | ११ | ११ |
| ३४ | गडचिरोली | ३ | ५ |
| | एकूण | ३४५ | ४९० |